# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## ( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र. २७ /२०२४

या परिपत्रकाव्दारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४ फेब्रुवारी, २०१६ नुसार राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालय विमा संचालनालयामार्फत समूह वैयक्तिक अपघात विमा योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेचा लाभ सद्य:स्थितीत राज्यातील काही नगरपालिका, महानगरपालिका व महामंडळे येथील कर्मचारी घेत आहेत. या वस्तुस्थितीचा सर्वकष विचार करुन शासकीय कर्मचाऱ्यास लाभदायी ठरेल अशी सर्वस्वी कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक वर्गणीवर आधारीत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्वरुपाची "राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना" दि.०१ एप्रिल, २०१६ पासून शासनाने सुरु केली आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ नुसार राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना दिनांक १ एप्रिल, २०१९ पासूनही अंमलात आली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा वर्गणी दरवर्षी माहे फेब्रुवारी देय माहे मार्चच्या वेतनातून वसूल करण्यात येईल. **मात्र सदर योजनेच्या अनुषंगाने निर्गमित उक्त नमूद शासन निर्णय दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१६ मधील परिच्छेद क्र.९ मध्ये "प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर सेवा निवृत्तीसाठी ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधी राहिलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही." आणि दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ मधील परिच्छेद क्र.१२ मध्ये "माहे एप्रिल ते माहे सप्टेंबर या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही." या तरतूदी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमासं-२०२३/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये व्रगळण्यात येत आहे.**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दिनांक २४ जानेवारी, २०२३ अन्वये दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी व राशीभूत रक्कम (Capital Sum Insured) यामध्ये वाढ करण्यात आली असून व सदर वर्गणी व राशीभूत रक्कम खालीलप्रमाणे गट निहाय निर्धारित करण्यात आली आहे :-

| अ.क्र. | गट | राशीभूत विमा रक्कम | वर्गणीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वार्षिक वर्गणी | वस्तू व सेवाकर | एकूण वार्षिक वर्गणी |
| १. | गट-अ | रुपये २५ लाख | रुपये ७५०/- | रुपये १३५/- | रुपये ८८५/- |
| २. | गट-ब | रुपये २० लाख | रुपये ६००/- | रुपये १०८/- | रुपये ७०८/- |
| ३. | गट-क | रुपये १५ लाख | रुपये ४५०/- | रुपये ८१/- | रुपये ५३१/- |
| ४. | गट-ड | रुपये १५ लाख | रुपये ४५०/- | रुपये ८१/- | रुपये ५३१/- |

सदर रक्कम अधिकारी/सेवकांच्या दरवर्षी माहे फेब्रुवारी देय माहे मार्चच्या वेतनातून वसूल करण्यात येईल. या योजनेसंदर्भातील शासन निर्णय व तद्अनुषंगिक माहिती सोबत जोडली आहे. **ज्या अधिकारी/सेवकांनी नामनिर्देशनाचा फॉर्म जमा केलेला नाही त्या अधिकारी/सेवकांनी सदर फॉर्म दोन प्रतीमध्ये तात्काळ बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत भरुन उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक / शिक्षकेतर कक्ष यांचेकडे पाठवावा.**

१४/२/२०२४

**(प्रा.(डॉ.) विजय खरे)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र.एएन/ 632
दिनांक : 14 FEB 2024

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

यांना विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शासनमान्य पदावरील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.

**सोबत :-**

1. **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४/०२/२०१६.**
2. **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र:संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दि.११/०८/२०१७.**
3. **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दि.२४/०१/२०२३.**
4. **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमासं-२०२३/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दि.०६/०२/२०२४.**

**राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना सुरू करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०४ फेब्रुवारी, २०१६.

**<u>प्रस्तावना: -</u>**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता राज्य शासनामार्फत राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२ राबविण्यात येते. सदर योजनेमध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्याचा अपघाती/नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या नामनिर्देशित वारसदारास विमा निधी म्हणून एक ठोक रक्कम देण्याची तरतूद आहे. परंतू सदर योजनेमध्ये अपघातामुळे कायम स्वरूपाचे अपंगत्व/विकलांगता आल्यास व त्यामुळे सदर कर्मचा-याच्या उपजीविकेस धोका निर्माण झाल्यास त्याला ठोस रकमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्याकरिता अपघात विमा योजना सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासनमान्य कर्मचारी संघटनांशी विचार विनिमय करून शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय:-

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालय विमा संचालनालयामार्फत समूह वैयक्तिक अपघात विमा योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेचा लाभ सध्यस्थितीत राज्यातील काही नगरपालिका, महानगरपालिका व महामंडळे येथील कर्मचारी घेत आहेत. या वस्तुस्थितीचा सर्वकष विचार करून शासकीय कर्मचाऱ्यास लाभदायी ठरेल अशी सर्वस्वी कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक वर्गणीवर आधारीत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्वरूपाची "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" दिनांक १ एप्रिल,२०१६ पासून शासन सुरू करीत आहे. प्रस्तुत योजनेचा तपशील सोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेला आहे.

२. सदर योजना सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू राहील.

३. सर्व विभाग प्रमुखांनी व कार्यालय प्रमुखांनी या राज्य शासकीय अपघात विमा योजनेचा तपशील आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि ही योजना दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून अंमलात आणली जाईल याची खात्री करून घ्यावी.

४. राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी वसूल करण्याची जबाबदारी सदस्य कार्यरत असलेल्या संबंधीत कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांची असेल.

५. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे फेब्रुवारी, २०१६ देय माहे मार्च, २०१६ च्या वेतनातून वसूल करणे आवश्यक राहील. त्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सेवार्थ प्रणालीत तशी व्यवस्था करावी. अपघात विमा वर्गणी "८१२१०५३९-०१ राज्य शासन विमा निधी" या जमेच्या लेखाशीर्षात जमेस दाखवावी.

६. संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सदर योजना राबवतील व सदर योजनेचे लेखांकन कार्यपध्दतीनुसार तिचे हिशेब ठेवतील. तसेच सदर अपघात विमा योजनेचा वार्षिक अहवाल वित्त विभागास सादर करतील.

७. राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना आणि राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२ या स्वतंत्र असतील. सेवेत असतांना सदस्याचा अपघाताने मृत्यू झाल्यास राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२ अंतर्गत देय विमा निधी रकमे व्यतिरिक्त समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेखालील लाभ देय असेल.

८. कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांसोबत अपघात विमा वर्गणी वसूली झाली आहे, याची खात्री कोषागार कार्यालयाने करावी. त्यासाठी संबंधीत कार्यालयाने कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांसोबत सदर शासन निर्णयाचे सहपत्र जोडपत्र -१ जोडणे अनिवार्य राहील. कोषागार कार्यालयाने सदर जोडपत्र -१ संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, २६४, गृहनिर्माण भवन, १ ला मजला, कलानगर समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे पाठविणे आवश्यक राहील.

९. प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर सेवा निवृत्तीसाठी ६ महिन्यापेक्षा कमी कालावधी राहिलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१६३०२९६६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=e52a2ce9d32e66b1d24d51eaca64e3ebef79bd73ef9543b72097c742eb1e708a, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2016.02.04 16:32:48 +05'30'

**शुभांगी शेठ**
उप सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव
३. वित्तमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५. सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
८. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई

१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
११.महालेखापाल (लेखापरीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२.महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१३.वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर
१४.अ.मु.स. (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१५.सचिव (व्यय) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१६.सचिव (ले.व.को.) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१७.सचिव (वि.सु.) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१८.बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
१९.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं-१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई -२०.
२०.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन,एस.व्ही.पटेल रोड, मुंबई -४
२१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस वरळी, मुंबई-१३
२२.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५
२३.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री-प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
२४.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चाळ, दादर, मुंबई -२८.
२५.मंत्रालयातील सर्व विभाग,
२६.सर्व विभागीय आयुक्त,
२७.सर्व जिल्हाधिकारी,
२८.सर्व जिल्हा प्ररिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
३०.मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३१.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
३२.सचिव, राज्य निवडणूक आयोग
३३.*प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
३४.*प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
३५.आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
३६.सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३७.महासंचालक, यशदा, पुणे
३८.*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
३९.*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई
४०.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
४१.*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

४२.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

४३.सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक अमरावती

४४.संचालक, विमा संचालनालय, मुंबई

४५.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई

४६.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

४७.संचालक, अर्थ व सांख्यिकी निधी लेखा परीक्षा, कोकण, पुणे नागपूर, औरंगाबाद, नाशिक अमरावती विभाग

४८.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

४९.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

५०.संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई / जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई

५१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

५२.सर्व उप कोषागार अधिकारी

५३.सर्व कृषी विद्यापीठे व इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

५४.प्र. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे, केंगाव, सोलापूर-४१३२५५

५५.वित्त विभागातील सर्व कार्यासने

५६.निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग

*पत्राने

## - परिशिष्ट -

अ. **राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेच्या सदस्यास अपघाती मृत्यू अथवा कायम स्वरूपी अपंगत्व/विकलांगता आल्यास खालील तक्त्यानुसार लाभ अनुज्ञेय असतील.**

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अपघातामुळे आलेला मृत्यू | १०० |
| २ | अपघातामुळे आलेले कायमचे अपंगत्व/विकलांगता | १०० |
| ३ | अपघातात दोन हात, दोन पाय, किंवा दोन्ही डोळे गमावून अपंगत्व/विकलांगता आल्यास | १०० |
| ४ | अपघातामध्ये एक हात, पाय अथवा डोळा गमावून अपंगत्त्व/विकलांगता आल्यास | ५० |
| ५ | कायमचे अंशतः अपंगत्व/विकलांगता | |
| | दोन्ही पायांचे अंगठे | २० |
| | अंगठ्याचे दोन्ही भाग | ५ |
| | अंगठ्याचा एक भाग | २ |
| | दोन्ही कानाचे बहिरेपण | ५० |
| | एका कानाचे बहिरेपण | १५ |
| | एका हाताची चारी बोटे व अंगठा | ४० |
| | हाताची चार बोटे | ३५ |
| | हाताच्या अंगठ्याचा एक पेरा | २५ |
| | हाताच्या अंगठ्याचे दोन्ही पेरे | १० |
| | तर्जनीचे तिन्ही पेरे | १० |
| | तर्जनीचे दोन पेरे | ८ |
| | तर्जनीचे एक पेरा | ४ |
| | मधल्या बोटाचे तिन्ही पेरे | ६ |
| | मधल्या बोटाचे दोन पेरे | ४ |
| | मधल्या बोटाचे एक पेरा | २ |
| | अनामिकेचे तिन्ही पेरे | ५ |
| | अनामिकेचे दोन्ही पेरे | ४ |
| | अनामिकेचा एक पेरा | २ |
| | करंगळीचे तिन्ही पेरे | ४ |
| | करंगळीचे दोन पेरे | ३ |
| | करंगळीचा एक पेरा | २ |

**ब. राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत दराचा व लाभाचा तपशील:-**

राज्य शासकीय कर्मचारी यांचेकरिता समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वार्षिक वर्गणी (विमादर) खालील तक्त्याप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट | राशीभूत विमा रक्कम (Capital Sum Insured) | वर्गणीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वार्षिक वर्गणी | प्रचलित सेवाकर | एकूण वर्गणी |
| १ | गट -अ ते ड | १० लाख | रुपये ३००/- | रुपये ४४/- | रुपये ३४४/- |

राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेखाली आकारण्यात येणारी वर्गणी ही केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रचलित सेवाकराच्या रकमेसह संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी भरणा करणे आवश्यक राहील.

**क. योजनेचा लाभ खालील कारणांकरिता देय होणार नाही.**

१. नैसर्गिक मृत्यू.
२. आत्महत्या वा तसा प्रयत्न.
३. जाणीवपूर्वक जखम करून घेणे.
४. अंमली अथवा मादक पदार्थांच्या अतिसेवनाने मृत्यू.
५. कोणत्याही प्रकारच्या स्पर्धांमध्ये मृत्यू झाल्यास.
६. शिकार, गिर्यारोहण.
७. योजनेच्या सभासदाच्या मृत्यूस त्यांच्या वारसदार/वारसदारांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्यास अशा वारसदारांना.
८. प्रसुती अथवा बाळंतपणा दरम्यान मृत्यू किंवा विकलांगता आल्यास.
९. गुन्हेगारी उद्देशाने कोणत्याही कायदयाचे उल्लंघन केल्यामुळे आलेला मृत्यू किंवा विकलांगता.
१०. गुप्त रोग अथवा वेडसरपणा यामुळे आलेला मृत्यू अथवा विकलांगता.
११. किरणोत्सर्ग, अणुभट्टया, युद्ध व बंड इत्यादी तत्सम कारणांमुळे उद्भवलेला मृत्यू अथवा विकलांगता.

------

**ड. सदस्यास विमा रकमेचे प्रदान खालील नियम, अटी व शर्तीच्या अधीन राहून देय असेल.**

१. योजनेचे सदस्यत्व स्वीकारतांना नाम निर्देशन करणे अनिवार्य आहे.

२. अपघाती मृत्यु अथवा कायमचे आंशिक अपंगत्व/विकलांगता आहे अशा प्रकरणात आवश्यक त्या परिस्थितीत पोलिसांकडे F.I.R. नोंदविलेला असणे आवश्यक आहे.

३. अपघातामुळे कायमचे आंशिक अपंगत्व/विकलांगता आली आहे ही बाब जिल्हा शल्य चिकित्सकाने किंवा विमा संचालक यांनी मंजुर केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पॅनल मधील चिकित्सक यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

४. सदस्याने अथवा त्याच्या नामनिर्देशीत वारसदाराने संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत विमादावा दाखल करणे आवश्यक आहे.

५. जर एखाद्या सदस्याने नामनिर्देशन पत्र दिले नसेल किंवा त्याने दिलेले नामनिर्देशन पत्र संपूर्णतः किंवा अंशतः अग्राह्य असेल तर विमा योजनेनुसार देय होणारी रक्कम सदस्यांच्या मृत्यूनंतर ज्या व्यक्तीस न्यायालयाकडून उत्तराधिकार प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे, अशा व्यक्तीस विमाछत्राची रक्कम प्रदेय राहील.

६. अपघाती निधन पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना/कुटुंबियांना संबंधीत कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकापासून वारसांनी/कुटुंबियांनी तथा कार्यालय प्रमुखांनी सदर योजनेअंतर्गत विमा दाव्याकरीता जोडपत्र - ३ तथा जोडपत्र-२ मध्ये नमूद सर्व कागदपत्रांची तातडीने पुर्तता केल्यानंतर समूह अपघात विमा योजनेच्या लाभाची रक्कम सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करून तीन महिन्यांच्या आत देण्यात येईल. संबंधीत कर्मचाऱ्याच्या वारसांनी/कुटुंबियांनी तथा कार्यालय प्रमुखांनी सदर योजनेअंतर्गत विमा दाव्याकरीता जोडपत्र-३ तथा जोडपत्र-२ मध्ये नमूद सर्व कागदपत्रांची तातडीने पुर्तता केल्यानंतरही तीन महिन्यांपेक्षा अधिक विलंब झाल्यास विलंब कालावधीकरीता व्याज देय राहील.

७. अपघाती मृत्यू समयी कर्मचाऱ्या विरूध्द विभागीय/न्यायिक कार्यवाही प्रलंबित असेल अथवा त्याचेकडून काही शासकीय येणे बाकी असले तरी अपघात विमा योजनेची प्रदेय रक्कम मृत्यूच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी. सदर रकमेचे प्रदान कोणत्याही परिस्थितीत रोखण्यात येवू नये.

८. समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची प्रदेय रक्कम प्रदान करण्यास प्रशासकीय चुकीमुळे तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा विलंब झाला असल्यास या चुकीस जबाबदार असणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व या प्रकरणी देय असणारी व्याजाची रक्कम विलंबास जबाबदार कर्मचारी

/अधिकारी यांचे कडून वसूल करण्यात यावी. मात्र, विलंब कालावधीसाठी देय असलेली व्याजाची रक्कम ही अपघात विमा योजनेच्या प्रदेय रकमेबरोबरच, या प्रकरणात करण्यात येणाऱ्या कार्यवाहीच्या निर्णयाची प्रतीक्षा न करता तात्काळ देण्यात यावी.

९. विलंब कालावधीकरिता व्याजाचा दर भविष्य निर्वाह निधीवरील प्रचलीत व्याज दरानुसार असेल.

१०. ही योजना राबविताना उद्भवलेल्या विमादावा प्रकरणात अन्वेषण/चौकशी करण्यासाठी अन्वेषकाची नेमणूक संचालक, विमा संचालनालय यांनी केल्यानंतर त्याचा तपासणी अहवाल लाभार्थीस स्वीकारणे अनिवार्य राहील.

११.एखाद्या प्रकरणी एकापेक्षा अधिक वारसांनी विम्याच्या रकमेवर हक्क दाखल केलेला असल्यास, जर विम्याची रक्कम रोखून ठेवण्यात आली असेल तर अशा प्रकरणी व्याज देय ठरणार नाही. असे प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून संचालक, विमा संचालनालय यांनी अंतिम निर्णय घ्यावा.

१२.योजनेबद्दल कोणतेही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याचे निराकरणासंबंधीचे अधिकार क्षेत्र महाराष्ट्र राज्य असेल.

१३.योजना प्रत्यक्षात कार्यान्वित करताना जर या "योजनेच्या" कोणत्याही तरतूदीच्या अर्थ उकलीबाबत कोणतीही शंका उद्भवली किंवा एखादया मुद्यावर स्पष्टीकरणाची गरज भासली तर ती बाब प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाकडे निर्देशित करावी. त्यासंबंधातील वित्त विभागाचा निर्णय अंतिम असेल.

१४."योजना" आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि स्वयंनिर्वाही राहील याची खात्री करून घेण्यासाठी दर एक वर्षाने योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल.

१५. या योजनेखाली लाभार्थींना एकाच वेळी एकाच अपघाताने परिशिष्ट - अ मधील अनुक्रमांक १ ते ५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या एकापेक्षा अधिक स्वरुपाचे लाभ मिळू शकणार नाही.

------

**जोडपत्र – १**

**राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना अंतर्गत अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या विमाहप्ता रकमेचा गट निहाय तपशील**

कार्यालयाचे नाव व पत्ता :

आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :

नियंत्रक अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :

**वर्गणीचा तपशील**

| अ.क्र. | गटनिहाय वर्गीकरण | कर्मचारी संख्या | वर्गणीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्गणी | सेवाकर | एकूण रक्कम |
| १ | गट -अ | | | | |
| २ | गट -ब | | | | |
| ३ | गट -क | | | | |
| ४ | गट -ड | | | | |
| | एकूण | | | | |

- सदर विवरणपत्रासोबत कर्मचाऱ्याची यादी जोडून याबाबतचा दस्तावेज कार्यालयाच्या अभिलेखी सुरक्षित ठेवण्यात यावा.

देयक क्र. व दिनांक

प्रमाणक क्र. व दिनांक

ठिकाण- कार्यालय प्रमुख/नियंत्रक अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व सही

दिनांक-

## जोडपत्र-२

### राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत सदस्याचा मृत्यू/विकलांगताबाबतचा दावा उदभवल्यानंतर कार्यालय प्रमुखाने सादर करावयाचा अर्जाचा नमूना

१. कार्यालयाचे नाव व पत्ता
दुरध्वनी, फॅक्स, email इत्यादी

२. आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

| | |
|---|---|
| ३. योजने अंतर्गत समाविष्ट कर्मचाऱ्याचा तपशील | नाव-<br>पदनाम-<br>गट- |
| ४. वेतनातून कपात करण्यात आलेल्या वर्गणीचा तपशील | वर्गणी रु.<br>देयक क्र. व दिनांक<br>प्रमाणक क्र. व दिनांक |

५. दावा दाखल करणाऱ्याचे नाव
(कर्मचारी/वारस)

६. अपघाताचा तपशील
अपघात दिनांक व वेळ
अपघाताचे कारण

७. विमादाव्याचे स्वरुप
(मृत्यू/विकलांगता)

| | |
|---|---|
| ८. दाव्यासंदर्भात दाखल करण्यात आलेली कागदपत्रे (जोडपत्र ३ प्रमाणे) | १.<br>२.<br>३. |

९. कार्यालय प्रमुखांची शिफारस

ठिकाण:- कार्यालय प्रमखाचे नाव पदनाम व सही

दिनांक:-

## <u>जोडपत्र - ३</u>

**राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत विमादाव्याविषयी सादर करावयाची कागदपत्रे**

<u>सदस्यास शारीरिक अपंगत्व/विकलांगता</u>

१. विमाधारकाने किंवा त्याच्या नामनिर्देशित वारसदाराने पूर्ण भरलेला अपघात विमादाव्याचा अर्ज
२. पोलिस पंचनामा आवश्यक असल्यास
३. जिल्हा शल्य चिकित्सकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र
४. शारीरिक अपंगत्व/विकलांगता दर्शविणारा फोटो

<u>सदस्याचा मृत्य झाल्यास</u>

१. विमाधारकाने किंवा त्याच्या नामनिर्देशित वारसदाराने पूर्ण भरलेला अपघात विमादाव्याचा अर्ज
२. मृत्यू प्रमाणपत्र
३. पोलिस पंचनामा आवश्यक असल्यास
४. शवविच्छेदनाचा अहवाल
५. इनक्वेस्ट रिपोर्ट (Inquest Report)

## जोडपत्र - ४

## नामनिर्देशनाचा नमुना

राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेखालील लाभासाठी नामनिर्देशन

(१)मी ------------------------ पदनाम ------------- याद्वारे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशावेळी माझा मृत्यू झाल्यास, अशी रक्कम घेण्यास माझ्या *कुटूंबातील खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी.

किंवा

(२)मी ------------------------ पदनाम ------------- कुटूंब धारण करीत नसल्यामुळे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यू झाल्यास, अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी. यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यानंतर हे नामनिर्देशन अवैध ठरेल.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/ व्यक्तींची नाव/नावे व पूर्ण पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला रकमेचा भाग | ज्या घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशा आकस्मिक घटना | वर्गणीदाराच्या आधी नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे जाईल त्या व्यक्तीचे/व्यक्तींचे नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

*महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या प्रकरण ९ मधील नियम क्र.१११ च्या पोट-नियम ५ मधील कुटुंब या व्याख्येनुसार

ठिकाण :

दिनांक : वर्गणीदाराची सही

सहीचे दोन साक्षीदारः-

१.

२.

---

[कार्यालयाच्या उपयोगासाठी]

नामनिर्देशन मिळाल्याचा दिनांकः-

दिनांकः- कार्यालय प्रमुखाचे पदनाम व सही

**"राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" निमशासकीय आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ६९ /विमा प्रशासन**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ११ ऑगस्ट, २०१७

वाचा-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि. ४ फेब्रुवारी, २०१६
२) वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ४५/विमा प्रशासन, दि. ११ मार्च, २०१६
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३१/विमा प्रशासन, दि.११ एप्रिल, २०१६
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५१/विमा प्रशासन, दि.१२ सप्टेंबर, २०१६
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१९/विमा प्रशासन, दि.१८फेब्रुवारी, २०१७

**प्रस्तावना-**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता शासनाने वरील संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णय ४ फेब्रुवारी, २०१६ अन्वये "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" दि.१ एप्रिल २०१६ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. उपरोक्त संदर्भ क्र. ३ व ४ च्या शा. नि. अन्वये सदर योजना महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासकीय सेवेतील व भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे. सदर अपघात विमा योजनेचा आढावा घेतल्यानंतर ही योजना शासकीय कर्मचाऱ्यांकरिता लाभदायी असल्याचे दिसून आल्याने संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये यापुढे सुरु ठेवण्यात आलेली आहे. सदर अपघात विमा योजनेंतर्गत राज्यातील अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना विम्याचे संरक्षण देण्याची मागणी शिक्षक परिषदेने केली आहे. तसेच, राज्यातील निमशासकीय कार्यालये, सांविधानिक मंडळे इत्यादी यांनीही सदर योजना लागू करण्याबाबत शासनास विनंती केली आहे. त्याअनुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता वरील संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णय दि. ४ फेब्रुवारी,२०१६ अन्वये सुरु केलेली व संदर्भ क्र .५ अन्वये ती पुढे सुरु ठेवण्यात आलेली "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना " राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, शासकीय महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, सांविधानिक संस्था, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था/महाविद्यालये, कृषि विद्यापीठे, पारंपारिक विद्यापीठे यांच्या अधिकारी/ कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून) यांना यावर्षी दि.१ ऑगस्ट,२०१७ पासून ही योजना लागू करण्यात येत आहे. व, पुढील वर्षापासून १ एप्रिल पासून अंमलात आणली जाईल.

२. सदर योजना ही **<u>ऐच्छिक</u>** स्वरुपाची असून या योजनेमध्ये सहभागी होण्याकरीता अधिकारी/कर्मचारी यांनी अनूमतिपत्र व नामनिर्देशन पत्र (जोडपत्र- ४ व ६ )विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्याकडे भरुन देणे आवश्यक आहे.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी “राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा ” तपशील आपल्या अधिनस्त प्रशासकीय विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

४. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखांने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्याच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे ऑगस्ट, २०१७ देय सप्टेंबर,२०१७ च्या वेतनातून कपात करणे आवश्यक राहिल. तद्‌नंतर दरवर्षी माहे फेब्रुवारी देय मार्चच्या वेतनातून वसूल करणे आवश्यक राहिल.

५. सदर समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी वसूल करण्याची जबाबदारी सदस्य कार्यरत असलेल्या संबंधीत कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल. तसेच, संबंधित विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी अपघात विमा योजनेची वर्गणी कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतनातून कपात करण्याबाबत वेतन प्रणालीमध्ये व्यवस्था करावी.

६. वेतन प्रणाली व्यतिरिक्त ग्रास प्रणाली, रोख, धनादेश/धनाकर्ष अन्वये स्वीकारण्यात येणाऱ्या या योजनेखालील रकमा जोडपत्र- १ मधील अनुसूचिसहीत संबंधीतांनी विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना परस्पर पाठवाव्यात. अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या रकमांच्या लेख्यांचे जतन करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखाची राहिल.

७. सदर अपघात विमा योजनेखाली देय राशीभूत विमा रक्कम व आकारण्यात येणाऱ्या वार्षिक वर्गणीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट | राशीभूत विमा रक्कम (Capital Sum Insure) | वर्गणीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वार्षिक वर्गणी | वस्तू व सेवाकर (GST) १८% | एकूण वर्गणी |
| १ | गट-अ ते ड | १० लाख | रु. ३०० | रु.५४ | रु.३५४ |

संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी योजनेची वार्षिक वर्गणी केंद्र शासनाने विहित केलेल्या वस्तू व सेवाकरासह (GST) भरणे बंधनकारक आहे. यापुढे, केंद्र शासनाने वस्तू व सेवाकराच्या दरामध्ये बदल केल्यास वेळोवेळी त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८. सदर योजनेखाली जमा होणारी विमा वर्गणी मागणी क्रमांक “ जे-राखीव निधी, (ए) व्याजी राखीव निधी , ८१२१ सर्वसाधारण व इतर राखीव निधी ,(००) १०९ सर्वसाधारण विमा निधी (००) (०३) राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा (८१२१ ५०७५)” या जमेच्या उपलेखाशीर्षात दाखविण्यात यावी.

(रिझर्व्ह बॅंकेत चलनाव्दारे वर्गणी जमा करताना सुलभ वर्गीकरणाकरिता चलनावर रिझर्व्ह बॅंक सांकेतांक क्र ०१५१३४०११०१ नमुद करण्यात यावा.)

९. संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सदर योजना राबवतील व सदर योजनेचे लेखांकन कार्यपध्दतीनुसार योजनेचे हिशोब ठेवतील. तसेच, सदर अपघात योजनेचा वार्षिक अहवाल वित्त विभागास सादर करतील.

१०. कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांसोबत अपघात विमा वर्गणी वसूली झाली आहे, याची खात्री कोषागार कार्यालयाने करावी. त्यासाठी संबंधित कार्यालयाने कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकासोबत सदर शासन निर्णयाचे सहपत्र जोडपत्र-१ जोडणे अनिवार्य राहील. कोषागार कार्यालयाने सदर जोडपत्र -१ संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, २६४, गृहनिर्माण भवन, १ ला मजला, कलानगर समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे पाठविणे आवश्यक राहील.

११. सदर योजनेखालील लाभासाठी जोडपत्र -४ मधील नामनिर्देशनपत्र भरून घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

१२. माहे एप्रिल ते माहे सप्टेंबर या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०८१११७०५२३६१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2017.08.11 16:56:27 +05'30'

**( शुभांगी शेठ )**
सह सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१.राज्यपालांचे सचिव
२.मा.मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव
३.मा.वित्तमंत्री यांचे यांचे स्वीय सहायक
४.मा.राज्यमंत्री वित्त यांचे स्वीय सहायक
५.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
६.सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७.सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
८.मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव

८.महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
९.महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल (लेखापरीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१४.वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर
१५.अ.मु.स. (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१६.अ.मु.स (व्यय) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१७.प्र.सचिव (ले.व.को.) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१८.सचिव (वि.सु.) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१९.मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभाग,
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा प्ररिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
२४.सर्व जिल्हापरिषदांचे अध्यक्ष,
२५.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२६. तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई .
२७. सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण)
२८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
२९. सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक,
३०. मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३१. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
३१. सचिव, राज्य निवडणूक आयोग
२७ *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२८ *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२९ आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
३०. सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३१.महासंचालक, यशदा, पुणे
३२*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
३३*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई
३४*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
३५*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
३६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३७.सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक अमरावती
३८.संचालक, विमा संचालनालय, मुंबई
३९.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई
४०.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
४१.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण, पुणे नागपूर, औरंगाबाद, नाशिक अमरावती विभाग

४२.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४४.संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई.
४४.संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई / जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४६.सर्व उप कोषागार अधिकारी
४७.सर्व कृषी विद्यापीठे व इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४८.प्र. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे, केंगाव, सोलापूर-४१३२५५
४९.वित्त विभागातील सर्व कार्यासने
५०.सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/पंचायत समित्या महाराष्ट्र राज्य ,
५१.सर्व विद्यापीठे महाराष्ट्र राज्य,
५२.सर्व महामंडळे व मंडळे महाराष्ट्र राज्य,
५२.निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग

- *पत्राने

**-परिशिष्ट-**

अ. **राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेच्या सदस्यास अपघाती मृत्यु अथवा कायम स्वरुपी अपंगत्व/विकलांगता आल्यास खालील तक्त्यानुसार राशीभूत विमा रक्कमेचे लाभ अनुज्ञेय असतील.**

| **अ.क्र** | **अपघाताचे स्वरूप** | **राशीभूत विमा रक्कमेची टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | अपघातामुळे आलेला मृत्यू | १०० |
| २ | अपघातामुळे आलेले कायमचे अपगंत्व/विकलांगता | १०० |
| ३ | अपघातात दोन हात, दोन पाय, किंवा दोन्ही डोळे गमावून अपगंत्व/विकलांगत आल्यास | १०० |
| ४ | अपघातामध्ये एक हात, पाय अथवा डोळा गमावून अपंगत्त्व/विकलांगता आल्यास | ५० |
| ५ | अपघातामध्ये खालीलप्रमाणे अवयव गमावून अंशतः अपंगत्व/विकलांगता आल्यास | |
| | पायांची सर्व बोटे | २० |
| | आगंठ्याचे दोन्ही पेर | ५ |
| | आगंठ्याचा एक पेर | २ |
| | आंगठ्या व्यतिरिक्त इतर बोटाच्या प्रत्येक पेरास | १ |
| | दोन्ही कानाचे बहिरेपण | ५० |
| | एका कानाचे बहिरेपण | १५ |
| | एका हाताची चारी बोटे व आंगठा | ४० |
| | हाताची चार बोटे | ३५ |
| | हाताच्या आंगठ्याचा एक पेर | १० |
| | हाताच्या आंगठ्याचे दोन्ही पेर | २५ |
| | तर्जनीचे तिन्ही पेर | १० |
| | तर्जनीचे दोन पेर | ८ |
| | तर्जनीचे एक पेर | ४ |
| | मधल्या बोटाचे तिन्ही पेर | ६ |
| | मधल्या बोटाचे दोन पेर | ४ |
| | मधल्या बोटाचे एक पेर | २ |
| | अनामिकाचे तिन्ही पेर | ५ |
| | अनामिकाचे दोन्ही पेर | ४ |
| | अनामिकाचे एक पेर | २ |
| | करंगळीचे तिन्ही पेर | ४ |
| | करंगळीचे दोन पेर | ३ |
| | करंगळीचा एक पेरा | २ |
| | बोटे व मनगट यांना जोडणाऱ्या अस्थी (metacarpals) | |
| | १. पहिले व दुसरे बोट (अतिरिक्त) | ३ |
| | २. तिसरे, चौथे व पाचवे बोट (अतिरिक्त) | २ |

**ब. राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा लाभ खालील कारणांकरिता देय होणार नाही.**

१. नैसर्गिक मृत्यू.
२. आत्महत्या वा तसा प्रयत्न.
३. जाणीवपूर्वक जखम करून घेणे.
४. अंमली अथवा मादक पदार्थांच्या अतिसेवनाने मृत्यू.
५. कोणत्याही प्रकारच्या स्पर्धांमध्ये मृत्यू झाल्यास.
६. शिकार, गिर्यारोहण.
७. योजनेच्या सभासदाच्या मृत्यूस त्यांच्या वारसदार/वारसदारांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्यास अशा वारसदारांना.
८. प्रसुती अथवा बाळंतपणा दरम्यान मृत्यू किंवा विकलांगता आल्यास.
९. गुन्हेगारी उद्देशाने कोणत्याही कायदयाचे उल्लंघन केल्यामुळे आलेला मृत्यू किंवा विकलांगता.
१०.गुप्त रोग अथवा वेडसरपणा यामुळे आलेला मृत्यू अथवा विकलांगता.
११.किरणोत्सर्ग, अणुभट्ट्या, युद्ध व बंड इत्यादी तत्सम कारणांमुळे उद्भवलेला मृत्यू अथवा विकलांगता.

---

**क. राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेच्या सदस्यास विमा रकमेचे प्रदान खालील नियम, अटी व शर्तीच्या अधीन राहून देय असेल.**

१. योजनेचे सदस्यत्व स्वीकारतांना नामनिर्देशन करणे अनिवार्य आहे.

२. अपघाती मृत्यु अथवा कायमचे आंशिक अपंगत्व/विकलांगता आहे अशा प्रकरणात आवश्यक त्या परिस्थितीत पोलिसांकडे F.I.R. नोंदविलेला असणे आवश्यक आहे.

३. अपघातामुळे कायमचे आंशिक अपंगत्व/विकलांगता आली आहे ही बाब जिल्हा शल्य चिकित्सकाने किंवा विमा संचालक यांनी मंजुर केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पॅनल मधील चिकित्सक यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

४. सदस्याने अथवा त्याच्या नामनिर्देशीत वारसदाराने संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत विमादावा दाखल करणे आवश्यक आहे.

५. जर एखाद्या सदस्याने नामनिर्देशन पत्र दिले नसेल किंवा त्याने दिलेले नामनिर्देशन पत्र संपूर्णतः किंवा अंशतः अग्राह्य असेल तर विमा योजनेनुसार देय होणारी रक्कम सदस्यांच्या मृत्यूनंतर ज्या व्यक्तीस न्यायालयाकडून उत्तराधिकार/वारस प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे, अशा व्यक्तीस विमा राशीभूत रक्कम प्रदेय राहील.

६. अपघाती निधन पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना/कुटुंबियांना संबंधीत कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकापासून वारसांनी/कुटुंबियांनी तथा कार्यालय प्रमुखांनी सदर योजनेअंतर्गत विमा दाव्याकरीता जोडपत्र - ५ मध्ये नमूद सर्व कागदपत्रांची तातडीने पुर्तता केल्यानंतर समूह अपघात विमा योजनेच्या लाभाची रक्कम सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करून तीन महिन्यांच्या आत देण्यात येईल. संबंधीत कर्मचाऱ्याच्या वारसांनी/कुटुंबियांनी तथा कार्यालय प्रमुखांनी सदर योजनेअंतर्गत विमा दाव्याकरीता

सर्व कागदपत्रांची तातडीने पुर्तता केल्यानंतरही तीन महिन्यांपेक्षा अधिक विलंब झाल्यास विलंब कालावधीकरीता व्याज देय राहील.

७. अपघाती मृत्यू समयी कर्मचाऱ्या विरूध्द विभागीय/न्यायिक कार्यवाही प्रलंबित असेल अथवा त्याचेकडून काही शासकीय येणे बाकी असले तरी अपघात विमा योजनेची प्रदेय रक्कम मृत्यूच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी. सदर रकमेचे प्रदान कोणत्याही परिस्थितीत रोखण्यात येवू नये.

८. समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची प्रदेय रक्कम प्रदान करण्यास प्रशासकीय चुकीमुळे तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा विलंब झाला असल्यास या चुकीस जबाबदार असणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व या प्रकरणी देय असणारी व्याजाची रक्कम विलंबास जबाबदार कर्मचारी /अधिकारी यांचे कडून वसूल करण्यात यावी. मात्र, विलंब कालावधीसाठी देय असलेली व्याजाची रक्कम ही अपघात विमा योजनेच्या प्रदेय रकमेबरोबरच, या प्रकरणात करण्यात येणाऱ्या कार्यवाहीच्या निर्णयाची प्रतीक्षा न करता तात्काळ देण्यात यावी.

९. विलंब कालावधीकरिता व्याजाचा दर भविष्य निर्वाह निधीवरील प्रचलीत व्याज दरानुसार असेल.

१०. ही योजना राबविताना उद्भवलेल्या विमादावा प्रकरणात अन्वेषण/चौकशी करण्यासाठी अन्वेषकाची नेमणूक संचालक, विमा संचालनालय यांनी केल्यानंतर त्याचा तपासणी अहवाल लाभार्थीस स्वीकारणे अनिवार्य राहील.

११.एखाद्या प्रकरणी एकापेक्षा अधिक वारसांनी विम्याच्या रकमेवर हक्क दाखल केलेला असल्यास, जर विम्याची रक्कम रोखून ठेवण्यात आली असेल तर अशा प्रकरणी व्याज देय ठरणार नाही. असे प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून संचालक, विमा संचालनालय यांनी अंतिम निर्णय घ्यावा.

१२.योजनेबद्दल कोणतेही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याचे निराकरणासंबंधीचे अधिकार क्षेत्र महाराष्ट्र राज्य असेल.

१३.योजना प्रत्यक्षात कार्यान्वित करताना जर या "योजनेच्या" कोणत्याही तरतूदीच्या अर्थ उकलीबाबत कोणतीही शंका उद्भवली किंवा एखादया मुद्यावर स्पष्टीकरणाची गरज भासली तर ती बाब प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाकडे निर्देशित करावी. त्यासंबंधातील वित्त विभागाचा निर्णय अंतिम असेल.

१४."योजना" आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि स्वयंनिर्वाही राहील याची खात्री करून घेण्यासाठी दर एक वर्षाने योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल.

१५. या योजनेखाली लाभार्थींना एकाच वेळी एकाच अपघाताने परिशिष्ट - अ मधील अनुक्रमांक १ ते ५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या एकापेक्षा अधिक स्वरुपाचे लाभ मिळू शकणार नाही.

## जोडपत्र – १

**राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजना अंतर्गत अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या वार्षिक वर्गणी रक्कमेचा गट निहाय तपशील**

कार्यालयाचे नाव व पत्ता :

आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :

नियंत्रक अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :

**वर्गणीचा तपशील**

| **अ.क्र.** | **गटनिहाय वर्गीकरण** | **कर्मचारी संख्या** | **वर्गणीचा तपशील** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वर्गणी** | **वस्तू व सेवाकर** | **एकूण रक्कम** |
| १ | गट -अ | | | | |
| २ | गट -ब (राजपत्रित व अराजपत्रित ) | | | | |
| ३ | गट -क | | | | |
| ४ | गट -ड | | | | |
| | एकूण | | | | |

- सदर विवरणपत्रासोबत कर्मचाऱ्याची यादी जोडून याबाबतचा दस्तावेज कार्यालयाच्या अभिलेखी सुरक्षित ठेवण्यात यावा.

देयक क्र. व दिनांक

प्रमाणक क्र. व दिनांक

ठिकाण- कार्यालय प्रमुख/नियंत्रक अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व सही

दिनांक-

**<u>जोडपत्र-२</u>**

**राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत सदस्याचा मृत्यू /विकलांगताबाबतचा दावा उदभवल्यानंतर कार्यालय प्रमुखाने सादर करावयाचा अर्जाचा नमूना**

१. कार्यालयाचे नाव व पत्ता
दुरध्वनी, फॅक्स, email इत्यादी

२. आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

| | |
|---|---|
| ३. योजने अंतर्गत समाविष्ट कर्मचाऱ्याचा तपशील | नाव-<br>पदनाम-<br>गट- |
| ४. कर्मचाऱ्याच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या वर्गणीचा तपशील | वर्गणी रु.<br>देयक क्र. व दिनांक<br>प्रमाणक क्र. व दिनांक |

५. कर्मचा-यांचा निवृत्तीचा दिनांक

६. दावा दाखल करणाऱ्याचे नाव
(कर्मचारी/वारस)

७. अपघाताचा तपशील
अपघात दिनांक व वेळ
अपघाताचे कारण

८. विमादाव्याचे
स्वरुप
(मृत्यू/विकलांग
ता)

| | |
|---|---|
| ९. दाव्यासंदर्भात दाखल करण्यात आलेली कागदपत्रे (जोडपत्र ५ प्रमाणे) | १.<br>२.<br>३. |

१०. कार्यालय प्रमुखांची शिफारस

ठिकाण:-

कार्यालय प्रमखाचे नाव पदनाम व सही

दिनांक:-

**जोडपत्र ३**

**राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमादावा अर्ज (Claim Form)**
**मृत्यू/विकलांगताकरिता**

| | | |
|---|---|---|
| १ | अ. योजनेच्या सदस्याचे नाव/नामनिर्देशित व्यक्तीचे नाव | |
| | ब. नामनिर्देशित व्यक्तीचे नाते | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता<br>(दुरध्वनी,ईमेल) | |
| ३ | राशीभूत विमा रक्कम | रू. |
| ४ | अपघातामुळे मृत्यू/विकलांगता आलेल्या योजनेच्या सदस्याचे नाव व वय | |
| ५ | अ.अपघाताचा दिनांक व वेळ<br>ब. अपघाताचे ठिकाण<br>क. साक्षीदाराचे नाव व पत्ता | |
| ६ | अपघाताचा तपशील | |
| ७ | अपघातामुळे उद्भवलेल्या विकलांगतेचे स्वरूप ( जसे. मृत्यू/कायमचे अपगंत्व/हात, डोळे, पाय तसेच इतर कायमचे अशंत: अपगंत्व इत्यादीचा तपशील) | |
| ८ | सदस्यावर उपचार करणाऱ्या शल्यचिकित्सकाचे नाव व पत्ता | |
| ९ | विमा संचालनालयाच्यावतीने वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती काय? असल्यास त्याचे नाव. | |

**<u>घोषणापत्र</u>**

मी खालील सही करणार असे घोषित करतो की वर उल्लेखित तपशील माझ्या माहितीनुसार सत्य व बरोबर असून यामध्ये काही विपर्यास्त तपशील आढळल्यास विमादावा नाकारण्यात येईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:
दिनाक : सदस्याचे/नामनिर्देशित व्यक्तीचे नाव व सही.

**जोडपत्र - ४**

**नामनिर्देशनाचा नमुना**

राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेखालील लाभासाठी नामनिर्देशन

(१) मी ------------------------ पदनाम ------------- याद्वारे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशावेळी माझा मृत्यू झाल्यास, अशी रक्कम घेण्यास माझ्या *कुटूंबातील खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी.

किंवा

(२) मी ------------------------ पदनाम ------------- कुटूंब धारण करीत नसल्यामुळे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यू झाल्यास, अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी. यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यानंतर हे नामनिर्देशन अवैध ठरेल.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/ व्यक्तींची नाव/नावे व पूर्ण पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला रकमेचा भाग | ज्या घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशा आकस्मिक घटना | वर्गणीदाराच्या आधी नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे जाईल त्या व्यक्तीचे/व्यक्तींचे नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

*महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या प्रकरण ९ मधील नियम क्र.१११ च्या पोट-नियम ५ मधील कुटुंब या व्याख्येनुसार

ठिकाण :

दिनांक :

वर्गणीदाराची सही

साक्षीदारांचे नांव व सही:-

१.

२.

---

[कार्यालयाच्या उपयोगासाठी]

नामनिर्देशन मिळाल्याचा दिनांक:-

दिनांक:- कार्यालय प्रमुखाचे पदनाम व सही

**जोडपत्र - ५**

**<u>राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेखाली विमादाव्याविषयी सादर करावयाची कागदपत्रे</u>**

<u>सदस्यास शारिरीक अपगंत्व/विकलांगता</u>

१. योजनेखाली कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या वर्गणीचा तपशील (जोडपत्र १)
२. दावा उद्भवल्यानंतर कार्यालय प्रमुखाने सादर करावयाचा अर्ज ( जोडपत्र-२)
३. विमाधारकाने किंवा त्याच्या कायदेशीर वारसदाराने पूर्ण भरलेला अपघात विमादाव्याचा अर्ज (जोडपत्र -३)
४. संबंधित पोलिस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला प्रथम खबर अहवालाची सांक्षाकित प्रत, आवश्यक असल्यास
५.पोलिस पंचनामा घटनास्थळ पंचनामा साक्षांकित प्रतआवश्यक असल्यास
६.शल्य चिकित्सकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र
७.शारिरीक अपगंत्व/विकलांगता दर्शविणारा फोटो
८.संबंधित कर्मचाऱ्या वेतनातून वर्गणी कपात केल्याबाबतची वेतनचिठ्ठी/प्रमाणपत्र

<u>सदस्याचा मृत्य झाल्यास</u>

१. योजनेखाली कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या वर्गणीचा तपशील (जोडपत्र -१)
२. दावा उद्भवल्यानंतर कार्यालय प्रमुखाने सादर करावयाचा अर्ज ( जोडपत्र-२)
३. विमाधारकाने किंवा त्याच्या कायदेशीर वारसदाराने पूर्ण भरलेला अपघात विमादाव्याचा अर्ज (जोडपत्र -३)
४. नामनिर्देशन पत्र (जोडपत्र -४)
५. मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत
६. संबंधित पोलिस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला प्रथम खबर अहवालाची सांक्षाकित प्रत, आवश्यक असल्यास
७. पोलिस पंचनामा/घटनास्थळ पंचनामा साक्षांकित प्रत
८. शवविच्छेदनाचा अहवाल साक्षांकित प्रत
९. मरणोत्तर पंचनामाची साक्षांकित प्रत
१०. संबंधित कर्मचाऱ्या वेतनातून वर्गणी कपात केल्याबाबतची वेतनचिठ्ठी/प्रमाणपत्र

जोडपत्र-६

**अनुमतीपत्र**

मी,श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------आपल्या विभागात /कार्यालयात---------------------------या पदावर कार्यरत आहे.

राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा /योजनेची सदस्य होण्यास मी इच्छूक आहे.

आपला/आपली

स्थळ:-

दिनांक

( )

अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेमध्ये बदल करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६४/विमा प्रशासन,**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी, २०२३

**वाचाः-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४.०२.२०१६
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३१/विमा प्रशासन, दि.११.०४.२०१६
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५१/विमा प्रशासन, दि.१२.०९.२०१६
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१९/विमा प्रशासन, दि.१८.०२.२०१७
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दि.११.०८.२०१७
६) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.८५/विमा प्रशासन दि.०५.०३.२०१९

**प्रस्तावना** :-

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता संपूर्णत: कर्मचाऱ्यांच्या वर्गणीवर आधारित अशी "राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना" दि.०४.०२.२०१६ च्या शासन निर्णयांन्वये दिनांक १ एप्रिल २०१६ पासून लागू करण्यात आली. सदर योजना पुढे सुरू ठेवण्यास दि.१८.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्ये मान्यता देण्यात आली. सदर योजनेची व्याप्ती वेळोवेळी वाढविण्यात आली असून त्यामध्ये भारतीय वन सेवेतील, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा व राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विविध घटकांचा समावेश केलेला आहे. सदर अपघात विमा योजनेखाली गट-अ ते ड मधील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता रु.३००/- इतक्या अत्यल्प वर्गणीमध्ये रुपये १०.०० लाख ही समान राशीभूत विमा रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. कर्मचारी / अधिकाऱ्यांचा आर्थिक स्तर, ७व्या वेतन आयोगामुळे वेतनात झालेली भरीव वाढ, महागाई निर्देशांक इत्यादी बाबी विचारात घेता, योजनेची वर्गणी व राशीभूत रकमेमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :-**

दि.०१ एप्रिल,२०२३ पासून राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी व राशीभूत रक्कम (Capital Sum Insured) यामध्ये वाढ करण्यात येत असून व सदर वर्गणी व राशीभूत रक्कम खालीलप्रमाणे गटनिहाय निर्धारित करण्यात येत आहे :-

| गट | राशीभूत विमा रक्कम | वार्षिक वर्गणी | वस्तू व सेवाकर | एकूण वार्षिक वर्गणी |
|---|---|---|---|---|
| गट-अ | रू.२५ लाख | रु. ७५०/- | रु.१३५/- | रु.८८५/- |
| गट- ब | रू.२० लाख | रू. ६००/- | रु.१०८/- | रु.७०८/- |
| गट- क | रू.१५ लाख | रू. ४५०/- | रु.८१/- | रु.५३१/- |
| गट- ड | रू.१५ लाख | रू. ४५०/- | रु.८१/- | रु.५३१/- |

**<u>टिप :</u>**- कालबद्ध पदोन्नती योजनेअंतर्गत किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वरिष्ठ वेतनश्रेणीच्या अनुषंगाने त्यांच्या मूळ पदाचा विचार न करता अपघात विमा योजनेची वर्गणी घेण्यात यावी व त्याप्रमाणे लाभ अनुज्ञेय करावेत. कर्मचाऱ्याकडून वर्गणी घेताना तो ज्या पदाचे वेतन घेत आहे त्या पदाच्या गटाप्रमाणेच वर्गणी घेण्यात यावी व लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत. तथापि, योजना वर्षाच्या कालावधीत त्या पदाचा गट बदलला तर त्यापुढील योजना वर्षाची वर्गणी व अनुज्ञेय लाभ यामध्ये बदल होतील.

२. माहे फेब्रुवारी महिन्याची वेतनाची देयके सादर झाल्यानंतर नियुक्त झालेले कर्मचारी तसेच, ज्या कर्माचाऱ्यांची वर्गणी माहे फेब्रुवारी महिन्यामध्ये वसूल करण्यात आलेली नाही, अशा कर्मचाऱ्यांना अपघात योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी, उपरोक्त परिच्छेद-१ मधील सुधारणांच्या अनुषंगाने, दि.०५.०३.२०१९ च्या शासन निर्णयाच्या पहिल्या परिच्छेदातील अ.क्र.४) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

योजना लागू होण्याच्या कालावधीनुसार खालीलप्रमाणे वर्गणी वसूल करण्यात यावी :-

| अ. क्र. | सदस्यत्व देण्याचा महिना | योजनेचा कालावधी | वर्गणीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | गट - अ | गट - ब | गट - क व ड |
| १ | एप्रिल ते सप्टेंबर | ६ महिन्यापेक्षा जास्त | रू.७५० + GST | रू.६०० + GST | रू.४५० + GST |
| २ | ऑक्टोबर ते डिसेंबर | ६ महिन्यापर्यंत | रू.५६३ + GST | रू.४५० + GST | रू.३३८+ GST |
| ३ | जानेवारी ते फेब्रुवारी | ३ महिन्यांपर्यंत | रू.३७५ + GST | रू.३०० + GST | रू.२२५ + GST |
| ४ | मार्च | १ महिन्यांपर्यंत | रू.१८८ + GST | रू.१५० + GST | रू.११३ + GST |

३. योजनेतील सदर सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखांने त्यांच्या अधीनस्थ कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे फेब्रुवारी, २०२३ देय मार्च, २०२३ च्या वेतनातून व तद्नंतर दरवर्षी कपात करणे आवश्यक राहील.

४. सदर अपघात विमा योजनेची वरीलप्रमाणे वर्गणी वसूल करण्याची जबाबदारी सदस्य कार्यरत असलेल्या संबंधित कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

५. संबंधित विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी अपघात विमा योजनेची सुधारित वर्गणी कर्मचारी / अधिकारी यांच्या वेतनातून कपात करण्याबाबत संबंधित वेतन प्रणालीमध्ये व्यवस्था करावी.

६. दि.१८.०२.२०१७, दि.११.०८.२०१७, व दि.०५.०३.२०१९ च्या शासन निर्णय तसेच, दि.१५.०२.२०१८ च्या परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे योजने संदर्भातील अन्य सर्व बाबींचे पालन करण्यात यावे.

७. अपघात विमा योजना ही विमाक्षेत्रातील प्रचलित वैयक्तिक अपघात विमापत्रक असून यास विमा अधिनियम, १९३८ च्या कलम ६४व्हीबी च्या तरतुदींचे अनुपालन अनिवार्य आहे. त्यामुळे, सदस्याच्या अपघातापूर्वी, वर्गणी योजनेच्या लेखाशिर्षामध्ये जमा होणे आवश्यक आहे. अन्यथा, विमावर्गणी अभावी विमादावा देय होणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यालयाची राहील.

८. अपघात विमा योजनेखाली योजनेच्या सदस्यास अपघातामुळे मृत्यू / विकलांगता उद्भवल्यास, त्याबाबतची लेखी सूचना विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना संबंधित कार्यालयाने त्वरित (१ महिन्याच्या आत) देणे आवश्यक राहील. तद्नंतर, दि.११.०८.२०१७ च्या शासन निर्णयातील जोडपत्र-५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या विमा दाव्यासंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता विनाविलंब करण्यात यावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०१२४११४५३३०२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2023.01.24 12:58:31 +05'30'

**( वि. रं. दहिफळे )**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.वित्तमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव
४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५) सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६) सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
७) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
८) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
११) महालेखापाल (लेखा परीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२) महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१३) वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर

१४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५) चालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१६) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९) सर्व उप कोषागार अधिकारी
२०) मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२१) मंत्रालयातील सर्व विभाग,
२२) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३) मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२५) सचिव, राज्य निवडणूक आयोग.
२६) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२८) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२९) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
३०) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
३१) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३२) महासंचालक, यशदा, पुणे
३३) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
३४) प्र.कुलसचिव, सर्व विद्यापीठे / कृषी विद्यापीठे / इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३५) वित्त विभागातील सर्व कार्यासने
३६) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३७) बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
३८) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं-१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई -२०.
३९) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन,एस.व्ही.पटेल रोड, मुंबई -४
४०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस वरळी, मुंबई-१३
४१) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५
४२) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री-प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
४३) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चाळ, दादर, मुंबई -२८.
४४) निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग.

*पत्राद्वारे.

**राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेतील तरतूद वगळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : विमासं-२०२३/प्र.क्र.६४/विमा प्रशासन**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०२४.

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४ फेब्रुवारी,२०१६.

२) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दि.११ ऑगस्ट, २०१७.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४ फेब्रुवारी,२०१६ मधील परिच्छेद क्र.९ मध्ये "प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर सेवा निवृत्तीसाठी ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधी राहिलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही," ही तरतूद वगळण्यात येत आहे.

२. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दि.११ ऑगस्ट, २०१७ मधील परिच्छेद क्र.१२ मध्ये "माहे एप्रिल ते माहे सप्टेंबर या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही." ही तरतूद वगळण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२०६१६५१४७२१०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2024.02.06 16:51:44 +05'30'

**( वि. रं. दहिफळे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.वित्तमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव
४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५) सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६) सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
७) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
८) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
११) महालेखापाल (लेखा परीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२) महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१३) वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर
१४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५) चालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१६) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९) सर्व उप कोषागार अधिकारी
२०) मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२१) मंत्रालयातील सर्व विभाग,
२२) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३) मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२५) सचिव, राज्य निवडणूक आयोग.
२६) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२८) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२९) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
३०) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
३१) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३२) महासंचालक, यशदा, पुणे
३३) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
३४) प्र.कुलसचिव, सर्व विद्यापीठे / कृषी विद्यापीठे / इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३५) वित्त विभागातील सर्व कार्यासने
३६) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३७) बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
३८) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं-१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई -२०.
३९) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन,एस.व्ही.पटेल रोड, मुंबई -४
४०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस वरळी, मुंबई-१३
४१) इंडियन नॅशनल कॉँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५
४२) राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री-प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
४३) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चाळ, दादर, मुंबई -२८.
४४) निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग